# महिला कक्ष

# अहवाल-२०२१-२२

# जागतिक महिला दिनानिमित्त विद्यार्थी, कर्मचारी यांची आरोग्यतपासणी






जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा नागरी(शासकीय) रुग्णालय, उस्मानाबाद यांच्या सहकार्याने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, महिला कक्ष, आणि अंतर्गत तक्रार समिती आयोजित विद्यार्थी-कर्मचारी आरोग्य तपासणी शिबीर उद्घाटन व तंबाखू विरोधी शपथ प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य,कर्मचारी,विद्यार्थी. दि. ०८.०३.२०२१











जागतिक महिला दिनानिमित्त समिती आयोजित विद्यार्थी-कर्मचारी आरोग्य तपासणी शिबीर-लाभार्थी विद्यार्थी व कर्मचारी. दि. ०८.०३.२०२१

# जागतिक महिला दिनानिमित्त विद्यार्थी, कर्मचारी यांची आरोग्यतपासणी व तंबाखू विरोधी शपथ कार्यक्रम

## दि. ०८.०३.२०२१, सोमवार

**उद्दिष्ट :-**

विद्यार्थी-कर्मचारी कल्याण योजनेच्या दृष्टीने व्यंकटेश महाजन महाविद्यालय नेहमीच विविध उपक्रम आयोजित करीत असते. विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि कर्मचारी यांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांना जागरूक करणे, धकाधकीच्या व ताणतणावाच्या आयुष्यात त्यांना वेळेवर स्वआरोग्यविषयक जाणीव व निदान करून देणे याबरोबरच आरोग्य तपासणी लाभार्थींना वेळेवर पूर्वउपचार घेता यावेत हा या उपक्रमामागील उद्देश होय.

८ मार्च २०२१ रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध उपाक्रम आयोजित करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, महिला कक्ष आणि अंतर्गत तक्रार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा नागरी(शासकीय) रुग्णालय, उस्मानाबाद यांच्या सहकार्याने सकाळी ११.३० वाजता विद्यार्थी व कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

कार्याक्रमचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रशांत चौधरी यांच्या हस्ते व जिल्हा नागरी(शासकीय) रुग्णालय, उस्मानाबाद येथील कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी जिल्हा नागरी(शासकीय) रुग्णालयाच्या महालॅबच्या प्रतीनिधींनी आरोग्य तपासणी व त्याचे महत्व याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्वांना तंबाखू विरोधी शपथ देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थी व कर्मचाऱ्यांची रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन व HIV तपासण्या करण्यात आल्या. या तपासण्या महालॅबच्या प्रतीनिधींनी डॉ विक्रांत राठोड श्री महादेव शिनगारे यांनी केल्या. त्यांना जिल्हा नागरी(शासकीय) रुग्णालय, उस्मानाबाद येथील स्टाफ शुभांगी रणखांब, सुनिता सस्ते, प्रदीप तटाळे, पाटील एन. आर., सुधीर कावळे यांनी सहकार्य केले. या आरोग्य तपासणीचा लाभ ४३ विद्यार्थी व कर्मचारी यांनी घेतला.

या कार्यक्रमाचे नियोजन प्रा डॉ. मकरंद चौधरी यांनी केले. तर त्यांना महिला कक्ष प्रमुख प्रा डॉ कुलकर्णी जयश्री , श्री. रविंद्र कुलकर्णी , श्री. रविंद्र सरवदे आणि अंतर्गत तक्रार समितीच्या पीठासन अधिकारी प्रा. लिंगे अनिता यांनी सहकार्य केले.

**उद्दिष्टपूर्ती :-**

विद्यार्थी-कर्मचाऱ्यांना नियमित आरोग्य तपासणीचे महत्व कळले. जाणीव-जागृती निर्माण झाली. तपासणीत झालेल्या निदान व रिपोर्टनुसार आवश्यक उपचार व पुढील चाचण्या करून पुढील आरोग्यविषयक समस्या टाळता आल्या. आपल्या दैनंदिन सवयी, आहार यामध्ये योग्य बदल करण्याची जाणीव झाली.